**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी उद्या होणाऱ्या मतदानाकरता अधिकारी-कर्मचारी मतदान केंद्रावर रवाना

- राज्यातल्या १ लाखांहून अधिक मतदान केंद्रावर ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार बजावणार मताधिकार

- ब्राझिलमध्ये सुरू असलेल्या जी ट्वेंटी बैठकीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची जागतिक नेत्यांशी चर्चा

- भारतीय स्पर्धा आयोगाकडून व्हॉट्सॲपला २१३ कोटी रुपयांचा दंड

**आणि**

- आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव उद्यापासून गोव्यात

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्यासाठी अधिकारी-कर्मचारी मतदान केंद्रांवर रवाना होत आहेत. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्रं उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल. सर्वाधिक सुमारे साडे ८ हजार मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहेत. त्यानंतर **मुंबई उपनगर, ठाणे**, या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी सव्वा ९ शे मतदान

केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. **गडचिरोलीत** सुद्धा १ हजार पेक्षा कमी मतदान केंद्र आहेत. मतदारसंघाचा विचार करता सर्वाधिक ५७४ मतदान केंद्र रायगड जिल्ह्यात **पनवेल** मतदार संघात आहेत. **खडकवासला, भोसरी, हडपसर, मुरबाड, नालासोपारा** वगैरे मतदार संघात मोठ्या प्रमाणात मतदान केंद्र आहेत. **मुंबईत वडाळा मतदारसंघात** सर्वात कमी म्हणजे २२३ मतदान केंद्र आहेत. **वरळी, माहिम, कुलाबा, मुंबादेवी** या मतदारसंघातही मतदान केंद्रांची संख्या अडीचशे पेक्षा कमी आहे. सर्वाधिक सर्वाधिक २६ मतदार संघ मुंबई उपनगर जिल्ह्यात असून त्यानंतर **पुणे, छत्रपती संभाजीनगर** यांचा क्रमांक लागतो.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ३ हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि २ तृतीयपंथी आहेत.

**बीड** जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात सर्वाधिक ३४ उमेदवार रिंगणात आहेत. **पुणे** जिल्ह्यात सर्वाधिक ३०३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्वात कमी १७ उमेदवार **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आहे. **उत्तर नांदेड** मतदारसंघामध्ये ३३, **जालन्यात भोकरदनमध्ये** ३२, **बीडमध्ये** ३१ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. **नंदूरबार** जिल्ह्यातल्या **शहादा** मतदार संघात सर्वात कमी ३ उमेदवार रिंगणात आहेत. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात **कुडाळमध्ये** आणि **रायगड** जिल्ह्यात महाडमध्ये प्रत्येकी ५ उमेदवारांचं नशीब उद्या मतपेटीत बंद होईल. **नांदेड** लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही उद्या मतदान होणार आहे आणि त्याठिकाणी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या २८८ मतदार संघांमध्ये १५८ पक्षांकडून २ हजार ५० उमेदवार रिंगणात आहे. उर्वरित २ हजार ८६ अपक्ष आहेत. सर्वाधिक २३७ उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून वंचित बहुजन आघाडीचे २०० उमेदवार रिंगणात आहेत. भाजपानं १४९, मनसेनं सव्वाशे, काँग्रेसनं १०१ उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून ९५, शरद पवारांकडून ८६, एकनाथ शिंदेंकडून ८१, अजित पवारांकडून ५९ उमेदवार नशीब आजमावत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाकडून ९३, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाकडून ३२, प्रहार जनशक्तीचे ३८, माकपाचे ३, MIM चे १७, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे ४, जनसुराज्य शक्तीचे ६, शेकापचे १८, समाजवादी पार्टीचे ९ आणि भाकपाचे २ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानाचा हक्क बजावण्यात महिलांपेक्षा पुरुष आघाडीवर असल्याचा सर्वसाधारण कल आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी मतदारांना केलेलं आवाहन आता ऐकूया

- **होल्ड बाइट फणसाळकर**

यंदा मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी निवडणूक आयोग, स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था यांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. सर्वत्र मतदान केंद्रांची माहिती देणाऱ्या मतदान चिठ्ठ्या निवडणूक आयोगानं घरोघरी पोहोचवल्या आहेत. मुंबईत एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात मतदान केंद्र असल्यानं विविध रंगांनी ही

केंद्र सजवली आहेत आणि मतदान चिठ्ठ्यांवरही त्या रंगांचे स्टिकर लावले आहे. त्यामुळं मतदारांना त्यांचं मतदान केंद्र शोधणं सोपं होईल. मतदान केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी रेल्वे, मेट्रोनं अतिरिक्त वेळासाठी सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मुंबईत दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांना त्यांच्या घराजवळून मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी मोफत वाहन व्यवस्थेची सोयही आहे.

**<><><><><>**

नागपुरात पारडशिंगा इथं माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या गाडीवर काल रात्री दगडफेक झाली. या घटनेत देशमुख यांच्या डोक्याला मार लागला असून या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**हिंगोली** जिल्ह्यात कळमनुरी विधानसभा मतदारसंघातले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. दिलीप मस्के यांच्या गाडीवर रात्री दगडफेक झाली. त्यांत डोक्याला मार लागल्यानं मस्के यांच्यावर नांदेडच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार असून त्यासाठी सर्व व्यवस्था पूर्ण करण्यात आली आहे. उद्या सकाळी ७ वाजल्यापासून ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाची वेळ आहे. मतदान सुरळीत पार पडावं यासाठी राज्यभरात एकूण १४ हजार २१८ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. केंद्रीय निमलष्करी दलाच्या सहाशे तुकड्या संवेदनशील भागात तैनात करण्यात आल्या आहेत. दुसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांमधल्या ३८ मतदारसंघांत मतदान होणार असून एकूण ५२८ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><>**

ब्राझिलमध्ये रिओ-दी-जानेरो इथं सुरु असलेल्या जी ट्वेंटी बैठकीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय बैठका केल्या. युरोपियन युनियनचे अध्यक्षांबरोबरच्या बैठकीत प्रधानमंत्र्यांनी भारत नेहमीच जगात सगळ्यांच्या भल्यासाठीच काम करत असल्यावर भर दिला. भूक आणि गरिबी याविरुद्ध ब्राझिलने जागतिक आघाडी उघडल्याबाबत त्यांनी प्रशंसा केली. शाश्वत शेती, सेंद्रीय शेती, भरडधान्य आणि हवामान-अनुकूल शेती ही भारताची उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्र्यांनी स्पष्ट केलं. जागतिक स्तरावरच्या सर्वसमावेशक विकासासाठी भारताने राबवलेले डिजीटल कृषी अभियानासारखे नवोन्मेषक कार्यक्रम मॉडेल म्हणून काम करतील, असंही प्रधानमंत्र्यांनी अधोरेखित केलं. पारंपारिक उपक्रम आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या एकत्रीकरणानेच भूक आणि गरिबीशी लढता येईल, असंही मोदी यांनी नमूद केलं.

**<><><><>**

सीसीआय अर्थात भारतीय स्पर्धा आयोगाने मेटा या कंपनीला व्हॉट्सॲप या समाज माध्यमावरच्या गोपनीयता धोरणातल्या बदलासाठी २१३ कोटी १४ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसंच, पुढच्या पाच वर्षांसाठी जाहिरात प्रसारणाच्या उद्देशाने मेटाच्या मालकीच्या इतर ॲप्लिकेशनसह ग्राहकांची माहिती सामायिक करणं थांबवण्याचे आदेशही दिले आहेत.

**<><><><>**

इफ्फी अर्थात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून गोव्यात सुरुवात होत आहे. या महोत्सवात ८१ देशांमधले एकूण १८० चित्रपट प्रदर्शित केले जातील. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काल वार्ताहर परिषदेत या

महोत्सवाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. महोत्सवस्थळी जाण्यासाठी विनाशुल्क वाहन व्यवस्था तसंच चोख सुरक्षा व्यवस्था असल्याचं त्यांनी नमूद केलं. जागतिक चित्रपटाच्या दुनियेतले आगळेवेगळे स्वर आणि नवोन्मेषशाली कथन अधोरेखित करणाऱ्या इफ्फी या महोत्सवाचं हे पंच्चावन्नावं वर्ष आहे. इफ्फी हा जागतिक सिनेमाविश्व आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांचा महोत्सव 28 नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

<><><><><>

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना हवामान बदल आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम यासाठी जिल्हा आणि शहर पातळीवर कृती योजना विकसित करण्याचे आदेश दिले आहेत.

//<><><><><>//